महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in

क्रमांक कशिमं/२०२५/पाच/६७४ दिनांक :- १८.०७.२०२५.

वाचावे :- १) शासन निर्णय क्रमांक /एडीआर-२०१४/प्र.क्र.२१८/तांशि-६, दिनांक १६.०२.२०१५.

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय दिनांक १६.०२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुर्नरचित अभ्यासक्रमास सन २०१५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ चे आयोजन दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ ते दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे.

संबंधित केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षेकरिता विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करताना फक्त (एलिमेंटरी किंवा इंटरमिजिएट) एकाच परीक्षेसाठी नोंदणी करण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांच्या नावामध्ये चूक होऊ नये याकरिता सर्वसाधारण नोंदवहीतील (General Register) नावाप्रमाणे अचूक नावाची ऑनलाईन नोंदणी करावी.

शासकीय रेखाकला परीक्षा केंद्रांची नोंदणी, विद्यार्थ्यांची नोंदणी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने https://www.msbae.ac.in या संकेतस्थळावर व https://dge.msbae.in या लिंकवर भरावयाचे असल्यामुळे याबाबत सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व सहभागी शाळा यांना शासकीय रेखाकला परीक्षा केंद्र प्रमुख यांनी निदर्शनास आणावे.

परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणाऱ्या नोंदणीचा तक्ता खालील प्रमाणे.

### शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५

*एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक*

| अ.क्र. | विषयाचे नाव | परीक्षेची वेळ |
|---|---|---|
| *बुधवार, दिनांक २४ सप्टेंबर, २०२५* | | |
| १ | वस्तुचित्र (Object Drawing) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |
| *गुरुवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२५* | | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.०० (२.३० तास) |
| ४ | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | २.०० ते ४.०० (२.०० तास) |

*इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा वेळापत्रक*

| | | |
|---|---|---|
| *शुक्रवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५* | | |
| १ | स्थिरचित्र (Still Life) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.३० ते ४.३० (२.०० तास) |

| शनिवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ | | |
|---|---|---|
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.३० (३.०० तास) |
| ४ | कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन (Geometry, Solid Geometry & Lettering) | २.३० ते ५.३० (३.०० तास) |

ऑनलाईन नोंदणी करिता कालावधी खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | प्रदान करण्यात आलेला कालावधी |
|---|---|---|
| १ | केंद्राची माहिती अद्यावत करणे ऑनलाईन पध्दतीने. | दिनांक २१.०७.२०२५ ते दिनांक २६.०७.२०२५ पर्यंत |
| २ | केंद्राच्या अधिनस्त असलेल्या सहभागी शाळांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने. | दिनांक २१.०७.२०२५ ते दिनांक २६.०७.२०२५ पर्यंत |
| ३ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. | दिनांक २१.०७.२०२५ ते दिनांक २४.०८.२०२५ पर्यंत. |
| ४ | शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा परीक्षा शुल्क भरण्याचा दिनांक | दिनांक ०१.०८.२०२५ ते दिनांक २४.०८.२०२५ पर्यंत. |
| ५ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. (विलंब शुल्कासह) | दिनांक २५.०८.२०२५ ते दिनांक ३१.०८.२०२५ पर्यंत. |
| ६ | एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. (अति विलंब शुल्कासह) | दिनांक ०१.०९.२०२५ ते दिनांक १२.०९.२०२५ पर्यंत. |
| ७ | परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. | दिनांक २१.०७.२०२५ ते दिनांक ३१.०८.२०२५ पर्यंत. |

परीक्षा शुल्क तपशील खालील प्रमाणे.

| परीक्षेचे नाव | प्रती विद्यार्थी परीक्षा फी | प्रती विद्यार्थी विलंब शुल्कासह परीक्षा फी | प्रती विद्यार्थी अति विलंब शुल्कासह परीक्षा फी |
|---|---|---|---|
| ( महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरिता ) | | | |
| एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | रु.१००/- | रु.१००/- + रु.२००/- = रु.३००/- | रु.१००/- +रु.५००/-= रु.६००/- |
| इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | रु.२००/- | रु.२००/- + रु.४००/-= रु.६००/- | रु.२००/- + रु.५००/- = रु.७००/- |
| ( महाराष्ट्रा बाहेरील विद्यार्थ्यांकरिता ) | | | |
| एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | रु.२००/- | रु.२००/- + रु.४००/- = रु.६००/- | रु.२००/- +रु.५००/-= रु.७००/- |
| इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | रु.४००/- | रु.४००/- + रु.८००/-= रु.१२००/- | रु.४००/- + रु.५००/- = रु.९००/- |

सर्व संबंधित केंद्रप्रमुख, सहभागी शाळा, विद्यार्थी आणि पालक यांना कळविण्यात येते की, १२ सप्टेंबर २०२५ नंतर विद्यार्थी नोंदणीसाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आकस्मिक खर्चाकरिता आवश्यक असणाऱ्या रक्कमेचा तपशील स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल. ऑनलाईन पध्दतीने करावयाची नोंदणी व संबंधित माहिती https://www.msbae.ac.in या संकेतस्थळावर व https://dge.msbae.in या लिंकवर उपलब्ध राहील.

(विनोद रं. दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति :- केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा तथा मुख्याध्यापक /प्राचार्य (सर्व).

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई /नागपूर/औरंगाबाद.
३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
४) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
७) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
८) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
९) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.
१०) जिल्हा विद्यालय निरीक्षक, (सर्व) उत्तरप्रदेश / मध्यप्रदेश / उत्तराखंड/ छत्तीसगढ.
११) निवड नस्ती.